# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.10.2025** **वार:मंगळवार**

---

1. बिहार विधानसभा निवडणुकीसाठी येत्या 6 आणि 11 नोव्हेंबरला मतदान
2. देशातील सर्व राज्यांमध्ये मतदार यादीची सखोल पडताळणी मोहीम राबवणार-मुख्य निवडणूक आयुक्तांची माहिती
3. भारत मोबाईल कॉंग्रेसचं उद्या नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आणि
4. सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचा आजपासून मुंबईत प्रारंभ

**बिहार निवडणूक**

केंद्रिय निवडणूक आयोगानं काल बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. बिहारमध्ये 6 नोव्हेंबर आणि 11 नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात मतदान होणार आहे तर मतमोजणी 14 नोव्हेंबर रोजी होईल. एकंदर 243 पैकी पहिल्या टप्प्यात 121 तर दुसऱ्या टप्प्यात 122 मतदारसंघात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी येत्या 10 तारखेला अध्यादेश काढण्यात येणार असून 17 तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. राज्यात पहिल्यांदाच प्रत्येक मतदारसंघात एक तटस्थ निवडणूक निरीक्षक नेमण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मतदानासाठी राज्यात 90 हजार 712 मतदान केंद्रं उभारण्यात येतील. 7 राज्यातल्या पोटनिवडणुकाही पुढच्या महिन्यात घेण्यात येतील अशी घोषणा आयोगानं केली. पोटनिवडणुकीसाठी 11 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

**एसआयआर**

बिहार प्रमाणेच देशभरातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीची सखोल पडताळणी आणि सुधारणा करण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशभरात एसआयआर मोहीम राबावण्याची तयारी करण्यात येत आहे; याबाबतच्या तारखांची घोषणा निवडणूक आयोग योग्य वेळी करेल, असं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. बिहारमध्ये निवडणूक आयोगाने केलेल्या मतदार यादी सखोल पडताळणी मोहिमेनंतर मृत व्यक्ती, बेकायदा स्थलांतरित नागरिक आणि बनावट मतदार ओळखपत्रांच्या माध्यमातून मतदार यादीत समाविष्ट केलेल्या 69 लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज विविध राजकीय पक्षांच्या राज्यसभेतील नेत्यांना भेटणार आहेत. राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून राज्यसभा खासदारांबरोबरची त्यांची ही पहिली औपचारिक बैठक आहे. पुढच्या महिन्यात सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगानं सभागृहाचं कामकाज सुरळीतपणे चालावं यासाठी आजच्या बैठकीत चर्चा होणं अपेक्षित आहे.

**<u>मोबाइल कॉंग्रेस</u>**

आशियातील महत्त्वाचा दूरसंवाद आणि तंत्रज्ञान कार्यक्रम इंडिया मोबाईल कॉंग्रेस 2025 चं उद्घाटन उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत होणार आहे. बदलासाठी नवोन्मेष ही या चार दिवसांच्या मेळाव्याची संकल्पना आहे. दूरसंवाद आणि डिजिटल तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. या मेळाव्यात होणाऱ्या चर्चासत्रांमध्ये 6जी परिसंस्था, सायबर सुरक्षा, उपग्रह दूरसंवाद, कृत्रिम बुद्धीमत्ता, दूरसंवाद उत्पादन इत्यादी विषयांवर विचारविनिमय केला जाईल. दरम्यान केंद्रिय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य सिंदीया यांनी काल या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

**<u>पंतप्रधान-मुंबई</u>**

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन उद्या बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. येत्या डिसेंबरपासून या विमानतळावरून उड्डाणांना सुरुवात होईल. महाराष्ट्र नगरविकास आणि औद्योगिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी नुकतीच ही माहिती दिली.

**<u>जयशंकर</u>**

जगातली स्पर्धा आणि अनिश्चिता वाढत असून अशा अस्थिर परिस्थितीत सतत प्रगती करत राहण्यासाठी भारतानं धोरणात्मक रितीनं वाटचाल करणं आवश्यक आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत अरावली शिखर परिषदेत बोलत होते. एखाद्या देशात राबवल्या जाणाऱ्या नवनव्या संकल्पनांच्या सामर्थ्यावरुन त्या देशाच्या ताकदीचा अंदाज बांधला जातो असं सांगून जयशंकर यांनी बदलती जागतिक स्थिती, त्याचे धोरणात्मक परिणाम आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा भारताचा दृष्टीकोन याबाबतचे आपले विचार व्यक्त केले. जेएनयूमधल्या आंतरराष्ट्रीय अभ्यास संस्थेला 70 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ही शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती.

**<u>फिनटेक</u>**

सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचा प्रारंभ आजपासून मुंबईत होत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक जगासाठी वित्तीय उपलब्धता ही या वर्षीच्या महोत्सवाची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर गुरुवारी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांशी ते संवादही साधणार आहेत.

**<u>जीएसटी बचत उत्सव</u>**

गेल्या महिन्याच्या 22 तारखेपासून देशभरात लागू झालेल्या जीएसटी दर कपातीमुळे सध्या देशात जीएसटी बचत उत्सव सुरू असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलं आहे. या जीएसटी बचत उत्सवाचा समाजातील सर्व घटकांना फायदा होत आहे. या दरकपातीमुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे, ऐकुया याबाबतचा एक वृत्तांत.....

**कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांना बळकटी देणारी अर्थव्यवस्था असलेल्या महाराष्ट्राला नुकत्याच जाहीर झालेल्या जीएसटी सुधारणांमुळे मोठा फायदा होणार आहे. राज्यातील शेतकरी, कारागीर आणि लघु व्यवसायांना यामुळे दिलासा मिळणार आहे. सुधारित कर रचनेअंतर्गत राज्यातील अनेक वस्तूंवरचा कर आता पूर्वीच्या 12 टक्क्यांवरून 5 टक्के करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या साखर पट्ट्यासाठी हा निर्णय फायद्याचा ठरणार आहे. या**

**निर्णयामुळे साखरेचे दर कमी होणार असल्याने त्याचा फायदा 50 लाखांहून अधिक ऊस उत्पादक शेतकरी आणि 2 लाख साखर कामगारांना होणार आहे. प्रक्रिया केलेले मासे आणि सागरी उत्पादने यांचा दर 12 टक्क्यांवरून 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे, त्याचा फायदा 2 लाखांहून अधिक मच्छिमारांना फायदा झाला आहे. हातमाग, कापड आणि हस्तकला क्षेत्रालाही या निर्णयाचा मोठा लाभ होणार असून इचलकरंजी, सोलापूर आणि पैठण इथला वस्त्रोद्योग कोल्हापुरी चप्पल, पारंपारिक हस्तकला उद्योग, अशा विविध क्षेत्रातील 11 लाखांहून अधिक कामगार आणि कारागिरांना जीएसटी दर कपातीमुळे फायदा होणार आहे.**

**इस्राइल हमास चर्चा**

गाझामधला संघर्ष थांबवण्याबाबत अमेरिकेनं तयार केलेल्या आराखड्यावर इस्राइल आणि हमासच्या अधिकाऱ्यांची इजिप्तमध्ये चर्चा सुरू आहे. पॅलेस्टाइनच्या कैद्यांची आणि इस्राइलच्या ओलिसांची मुक्तता करण्यावर या चर्चेत भर दिला जात आहे. विशिष्ट अटींची पूर्तता झाल्यावर इस्राइलच्या सर्व ओलिसांना सोडण्याची तयारी असल्याचं हमासनं म्हटलं आहे. मात्र सैन्यमाघारी आणि गाझामधल्या राजकारणातला सहभाग याबाबत हमासनं आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.

**ट्रम्प**

सर्व प्रकारच्या मध्यम आणि अवजड ट्रक्सच्या येत्या 1 नोव्हेंबरपासून आयातीवर 25 टक्के शुल्क लादण्यात येईल अशी घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिकेत सुमारे 20 लाखांपेक्षा जास्त नागरिक ट्रकचालक म्हणून काम करतात आणि ट्रक वाहतूक उद्योग हा तिथल्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचं तिथल्या चेंबर ऑफ कॉमर्सनं म्हटलं आहे.

**नोबेल**

मेरी ब्रूनकोव्ह, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना शरीरक्रिया शास्त्रातल्या क्रांतिकारी संशोधनासाठी 2025 या वर्षाचा वैद्यकीय क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या संशोधनामुळे स्वयं प्रतिकार आजारांवर उपचार करता येणार आहेत आणि ते पूर्ण बरेही करता येणार आहेत. यासोबतच कर्करोग आणि स्टेम सेल प्रत्यारोपणानंतरची गुंतागुंतही टाळता येणार आहे.

**क्रिकेट महिला**

आयसीसी महिला क्रिकेट विश्व करंडक स्पर्धेत काल दक्षिण अफ्रिकेच्या संघानं न्यूझीलंडवर 6 गडी राखून विजय मिळवला. इंदोरमध्ये झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करताना 232 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण अफ्रिकेनं 41 व्या षटकांतच 4 गडी बाद 234 धावा केल्या. आज इंग्लंड आणि बांग्लादेश संघांदरम्यान सामना होणार आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.